दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता

प्रतिनिधी नेमणे आहे
लोकप्रिय विभागीय दैनिक वादळ वार्ता साठी महाराष्ट्रात सर्वत्र जिल्हा, तालुका, सर्कल व गावस्तरावर प्रतिनिधी नेमणे आहे. तरी इच्छुकानी मो.न.9422660077, 9766440025 संपर्क साधावा.

vadalvartanews@gmail.com ●संपादक : अजय भांगे ●उपसंपादक : गणेश गाडेकर https://epaper.vadalvarta.com

● बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ● बुधवार दि.६ ऑगस्ट २०२५ 9422660077 ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष २ रे ● अंक २५१ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

● Beed (Mahmar) Daily Marathi ● Wednesday 6 August 2025 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 2nd ● Issue 251 ● Pages 4 ● Rate 4 Rs

## नवीन प्रभाग रचना, ओबीसी आरक्षणासह
# होणार महापालिका निवडणुका

**मुंबई । वृत्तसंस्था**

सर्वोच्च न्यायालयाने नव्या प्रभाग (वॉर्ड) रचनेला आणि ओबीसी आरक्षणाला आव्हान देणाऱ्या सर्व याचिका फेटाळून लावत, निवडणुकांना मंजुरी दिली आहे. त्यामुळे आता संपूर्ण राज्यभरात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका नव्या प्रभाग रचनेनुसार आणि २७ टक्के ओबीसी आरक्षणासह होणार हे निश्चित झाले आहे. त्यामुळे महापालिका, नगरपालिका आणि जिल्हा परिषद निवडणुकांचा मार्ग अखेर मोकळा झाला आहे.नव्या प्रभाग रचनेला आव्हान देणाऱ्या विविध याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आल्या होत्या. काही स्थानिक घटकांनी नव्या रचनेतील बदलांवर आक्षेप घेतले होते. मात्र, आज न्यायालयाने या याचिका फेटाळत राज्य सरकारच्या निर्णयावर शिक्कामोर्तब केले. त्यामुळे मुंबई, पुणे, पिंपरी-चिंचवड, नाशिक यांसारख्या महत्त्वाच्या महापालिकांमध्ये नव्या प्रभाग बांधणीच्या आधारे निवडणुका घेण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.लातूर जिल्ह्यातील औसा नगरपालिकेच्या निवडणुकी संदर्भात एक याचिका सुप्रीम कोर्टात दाखल करण्यात आली होती. याचिकेत ११ मार्च २०२२ पूर्वीच्या वॉर्ड रचनेनुसार निवडणूक घेण्याची मागणी करण्यात आली होती. या याचिकेवर आज सुनावणी झाली असून, सुप्रीम कोर्टाने ती फेटाळून लावली. ही निवडणूक सुद्धा नवीन वॉर्ड रचनेप्रमाणे घेण्यात यावी, असे निवडणूक आयोगाने अधिसूचित केले होते. त्यामुळे आजच्या आदेशाप्रमाणे नवीन वॉर्ड/प्रभाग रचनेनुसार निवडणुका होतील, हे पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे.




स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत ओबीसी आरक्षणाला आव्हान देणारी याचिका देखील सुप्रीम कोर्टाने आज फेटाळून लावली. या याचिकेच्या सुनावणीवेळी सुप्रीम कोर्टाने सांगितले की, आमच्या ६ मे २०२५ च्या आदेशानुसार २७% ओबीसी आरक्षणानुसारच निवडणुका घेण्यात येतील. तसेच वॉर्ड किंवा प्रभाग रचना हा पूर्णपणे राज्य सरकारचा अधिकार आहे. राज्य विधिमंडळाने तसा कायदा केला आहे आणि या कायद्याला स्थगिती नसल्याने हा पूर्णपणे अधिकार राज्य सरकारचा आहे, असेही सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले.

दरम्यान, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर नवी प्रभाग रचना की जुनी प्रभाग रचना याविषयी वाद सुरू होता. महाविकास आघाडीच्या काळात प्रभाग रचनेमध्ये काही बदल करण्यात आले होते. त्यानंतर शिंदे-फडणवीस सरकारच्या काळात पुन्हा त्या प्रभाग रचनेत बदल करण्यात आले. मात्र, वॉर्ड रचना कशी असावी याचा अधिकार पूर्णपणे राज्य सरकारचा आहे, त्यानुसार प्रभाग रचना होईल. जी प्रभाग रचना राज्य सरकार ठरवेल त्यानुसारच निवडणुका होईल, असे आज सर्वोच्च न्यायालयाने आदेशात स्पष्ट केले आहे.

## आवळा देवून कोहळा उपटला
# केज बस स्टँडवरून रुद्राक्ष देऊन ११ ग्रॅम वजनाची सोन्याची अंगठी लांबविली

**केज । गौतम बचुटे**

केज येथील बस स्टँड वरून बसची चौकशी करणाऱ्यांसाठी गेलेल्या ६५ वर्षाच्या वृद्ध प्रवाशाला गोड बोलून त्याला रुद्राक्ष देऊन त्याच्या हातातील ११ ग्रॅम वजनाची सोन्याची अंगठी काढून फसवणूक केल्याची घटना घडली आहे.आवळा देवून कोहळा काढणे अशी मराठीत म्हण आहे. तसाच एक प्रकार केज येथील बस स्टँडवर घडला आहे.






दि. ३ ऑगस्ट रोजी सकाळी १०:३० वा. च्या सुमारास लातूर जिल्ह्यातील रामेश्वर येथील सेवानिवृत्त कर्मचारी शिवाजी पंढरीनाथ बळवंत हे त्यांच्या टाकळी ता. केज येथील मुलगी निर्गुणा माने हिच्या सोबत धारूरला जाण्यासाठी केज येथील बस स्टँडवर आले होते. केज येथील बस स्टँडवर ते धारूरला जाणाऱ्या बसची चौकशी करीत असताना एक अनोळखी इसम त्यांच्या जवळ आला. त्याने शिवाजी बळवंत यांच्या हातात एक रुद्राक्ष देवुन त्यांना बोलण्यात गुंतवले व अप्रमाणीकपणे ठकवुन आणि बोलण्यात गुंगवुन त्यांच्या हातातील ११ ग्रॅम वजनाची सोन्याची अंगठी काढुन घेतली. त्या अंगठीची किंमत ५४ हजार ३ हजार ७४ रु. एवढी आहे. फसवणूक झाल्याचे लक्षात येताच शिवाजी बळवंत व त्यांची मुलगी निर्गुणा माने यांनी त्या ठकाचा शोध घेतला पण तो सापडला नाही.

शिवाजी बळवंत यांच्या तक्रारीवरून अज्ञात ठका विरुद्ध केज पोलिस ठाण्यात गु. र. नं. ४२४/२०२४, भा. न्या. सं. ३१८(४) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्यार्गदर्शनाखाली पोलिस हेडकॉन्स्टेबल दत्तात्रय बिक्कड हे तपास करीत आहेत.

# सुरक्षित बाहेर पडली बोट ॲम्ब्युलन्स सतर्क प्रशासनामुळे मोठी दुर्घटना टळली

**नंदुरबार । दिपक गोसावी.**

नंदुरबार, ५ ऑगस्ट २०२५: सरदार सरोवर परिसरात पाण्याच्या प्रवाहामुळे अडकलेली आरोग्य विभागाची बोट ॲम्ब्युलन्स अखेर सुरक्षित बाहेर काढण्यात यश आले आहे. प्रशासनाच्या सतर्कतेमुळे व तातडीच्या निर्णयामुळे कोणतीही जीवितहानी झाली नाही.

३ ऑगस्टच्या मध्यरात्री २ वाजण्याच्या सुमारास सरदार सरोवरमध्ये पाण्याचा प्रवाह अचानक वाढल्याने आरोग्य विभागाची बोट ॲम्ब्युलन्स ३०% पाण्याखाली गेली आणि अडकली. सुदैवाने, बोटमधील कोणीही जखमी झाले नाही.




या घटनेची माहिती मिळताच जिल्हाधिकारी डॉ.मित्ताली सेठी व मुख्य कार्यकारी अधिकारी सावण कुमार यांनी तात्काळ मदत व बचाव कार्य सुरू करण्याचे आदेश दिले. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. रविंद्र सोनवणे व अति. जिल्हा आरोग्य अधिकारी संदीप पुंड यांनी तांत्रिक उपाययोजनांवर लक्ष ठेवले.

प्रशासनाने तातडीने तांत्रिक पथके व मदत यंत्रणा कार्यान्वित केली. दोन दिवसांच्या अथक प्रयत्नांनंतर ५ ऑगस्ट रोजी सकाळी ही बोट सुरक्षितरित्या पाण्याबाहेर काढण्यात आली. या घटनेवरून प्रशासनाची आपत्कालीन व्यवस्थापन क्षमता दिसून आली असून, भविष्यात अशा घटनांना तोंड देण्यासाठी यंत्रणेला अधिक सक्षम करण्याचे आश्वासन जिल्हा प्रशासनाने दिले आहे.

# चहाचे पैसे मागताच दारूच्या नशेत तर्रर असलेल्या पाच जणांनी वेटरच्या डोक्यात चहाचा थर्मास मारून डोके फोडले

**केज । गौतम बुचुटे**

आडस येथे दारूच्या नशेत तर्रर असलेल्या पाच मद्यपींनी चहा पिल्या नंतर वेटरने चहाचे पैसे मागितल्याचा राग आल्याने त्यांनी वेटरला चहाच्या थर्मासने मारहाण करून जखमी केले आहे.



या बाबतची माहिती अशी की, आडस येथे विजय भाऊसाहेब काळे यांचे धारूर रोडवर कृषी उत्पन्न बाजार समिती समोर हॉटेल गावगप्पा बासुंदी चहा नावाचे हॉटेल आहे.

दि २ ऑगस्ट रोजी सायंकाळ ६:३० वा च्या सुमारासच दरम्यान विजय काळे यांना आप्प्या आडंगुले याने अभिजीत देशी दारुच्या दुकानाचे बाजुला चहाची ऑर्डर दिली. विजय काळे हे तेथे चहा घेऊन गेले त्या वेळी आप्प्या आडंगुले, राजा वाघमारे, कांबळे, प्रदीप वाघमारे उर्फ खजुर आणि राजु शेख हे दारुचे नशेत तर्रर होते. ते सर्वजण चहा पिले. त्या नंतर विजय काळे यांनी त्यांना चहाचे बिल मागितले असता, कशाचे चहाचे पैसे ? असे म्हणून त्यांनी विजय काळे यांच्या हातातील चहाचा थर्मास हिसकावून घेतला. तुझे कशाचे पैसे उपऱ्या ? असे म्हणुन शिवीगाळ केली. राजा वाघमारे व आप्या आडंगुले यांनी चहाचा थर्मास विजय काळे यांच्या डोक्यात मारुन दुखापत केली. राजा वाघमारे याने त्याच्या बेल्टने कपाळावर मारले व कांबळे याने छातीवर लाथा बुक्याने मारहाण केली. त्या सर्वांनी काळे याचे चहाचे कप, थर्मास व चष्मा फोडुन नुकसान केले.

**पाच जणां विरुद्ध गुन्हा दाखल**

मारहाणीत जखमी झालेल्या विजय काळे यांच्यावर धारूर येथील सरकारी दवाखान्यात प्रथमोपचार करून त्यांना अंबाजोगाई येथील सरकारी रुग्णालयात दाखल केले.

उपचारा नंतर विजय काळे यांनी धारूर पोलिस ठाण्यात दिलेल्या तक्रारी वरून आप्या आडंगुले, राजा वाघमारे, कांबळे, प्रदीप वाघमारे उर्फ खजुर आणि राजु शेख या पाच जणांच्या विरुद्ध गु. र. नं. २८२/२०२५ भा. न्या. सं. ११५(२), ११८(१), १८९(२), १९०, १९१(२), १९१(३), ३२४(४), ३२४(५), ३५१(२), ३५२ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सहाय्यक पोलिस निरीक्षक देविदास वाघमोडे यांच्या मार्गदर्शनाखाली हेडकॉन्स्टेबल लक्ष्मीकांत पवार हे तपास करीत आहेत.

_गुन्हेगारांची मग्रुरी !:- मारहाणीत जखमी झालेल्या विजय काळे यांना त्यांचे आई-वडील सरकारी दवाखान्यात उपचारासाठी घेऊन गेले असता तेथे राजा वाघमारे, प्रदीप वाघमारे आणि राजु शेख या तिघांनी त्यांचा पाठलाग करून त्यांना शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिली.

# कावड यात्रेत मोठ्या संख्येने सहभागी व्हा-साईनाथ आक्कमवार

**नायगाव । हनुमंत चंदनकर**

नायगाव तालुक्यातील नरसी येथील श्रीक्षेत्र नरसिंह मंदिर गोदावरी नदी राहेर ते श्रीक्षेत्र सिद्धेश्वर मंदिर महादेव मंदिर नरसी कावड यात्रा दिनांक सहा ऑगस्ट रोजी निघणार आहे कावड यात्रेचे मुख्य आकर्षण महादेव रथ भजनी मंडळ व शेकडो शिवभक्त कावडी घेऊन कावड यातील सहभागी होणार आहे यात्रेकरूंसाठी वाहनाची व्यवस्था करण्यात आलेली आहे जागोजागी चहा नाश्त्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे मुस्तापूर येथील पत्रकार हनुमंत चंदनकर यांच्या वतीने अमृत पानाचा चहा पाण्याचा कार्यक्रम करण्यात येणार आहे कावड यात्रेची सुरुवात गोदावरी मातेची महाआरती करून सुरुवात होणार आहे नरसिंह मंदिरात पूजा आजच्या विधी आटोपून नरसी कडे मार्गस्थ होणार आहे या यात्रेत सर्व भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित राहणार असून आपणही कावड यात्रेत सहभागी व्हावे असे आवाहन श्री शिवभक्त साईनाथ आक्कमवार नरसीकर



# महाराष्ट्रात पावसाचा जोर ओसरणार, चिंता वाढली

**मुंबई । वृत्तसंस्था**

यंदा मान्सून देशासह राज्यात वेळेपूर्वीच दाखल झाला, सामान्यपणे मान्सून महाराष्ट्रात सात जून रोजी दाखल होतो, मात्र मान्सून २५ मे रोजीच राज्यात दाखल झाला होता.यावर्षी राज्यात आतापर्यंत चांगला पाऊस झाला आहे, मात्र पावसाचं हे प्रमाण असमान आहे. विदर्भ आणि कोकणात जोरदार पाऊस झाला, मात्र मराठवाड्याला अजूनही चांगल्या पावसाची प्रतिक्षा आहे. मराठवाड्यातील अनेक जिल्ह्यात अति अल्प पाऊस झाला आहे. चांगला पाऊस झाला नसल्यामुळे पिके संकटात सापडली आहेत, आता आणखी एक शेतकऱ्यांच्या चिंतेत भर घालणारी बातमी समोर आली आहे.ती म्हणजे भारतीय हवामान विभागानं वर्तवलेल्या नव्या अंदाजानुसार मध्य भारत आणि महाराष्ट्रात पावसाचा जोर ओसरण्याची शक्यता आहे. हवामान विभागानं शनिवारी वर्तवलेल्या अंदाजानुसार राज्यात मान्सूनची अवस्था सध्या कमजोर झाली आहे. पुढील दोन आठवडे तरी राज्यात अशीच स्थिती कायम राहणार आहे. हवामान विभागानं दिलेल्या माहितीनुसार मान्सून ट्रफ आपल्या सामान्य स्थानापेक्षा अधिक उत्तरेकडे सरकरल्यानं मध्य भारत आणि महाराष्ट्रात पावसाचा जोर ओसरला आहे. त्यामुळे महाराष्ट्रात पावसाचं प्रमाण कमी होऊ शकतं, तर दुसरीकडे दक्षिण भारतात मात्र जोरदार पावसाची शक्यता आहे.

# बोरद येथे महसूल सप्ताहानिमित्त विविध दाखल्यांचे वाटप

**बोरद । प्रतिनिधी**

श्री छत्रपती शिवाजी महाराज महसूल अभियानांतर्गत महसूल सप्ताहानिमित्त बोरद येथे विविध दाखल्यांचे वाटप करण्यात आले. दिनांक ४ ऑगस्ट २०२५ रोजी बोरद येथील ग्रामपंचायत कार्यालयात प्रांत अधिकारी अनय नावंदर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि तहसीलदार दीपक धिवरे यांच्या हस्ते हा कार्यक्रम पार पडला.




यावेळी तहसीलदार दीपक धिवरे यांचे स्वागत ग्रामविकास अधिकारी विजय पाटील यांनी केले. कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज आणि बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून झाली. कार्यक्रमाला तहसीलदार दीपक धिवरे, नायब तहसीलदार विजय ससे, मंडलाधिकारी मिथुन राठोड, महसूल अधिकारी प्रदीप वसावे, ग्रामविकास अधिकारी विजय पाटील, न्यायालयीन कर्मचारी दीपक चौधरी आणि इतर विभागांचे कर्मचारी उपस्थित होते. बोरद मंडळातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.


या कार्यक्रमात नागरिकांच्या विविध समस्या सोडवण्यात आल्या. आधार कार्ड अपडेट करणे, न्यायालयीन कामकाज, नवीन बँक खाते उघडणे, कृषी व पुरवठा विभागाशी संबंधित कामे, जातीचे दाखले, जन्माचे दाखले, उत्पन्नाचे दाखले, रहिवासी दाखले आणि प्रधानमंत्री जनधन योजनेअंतर्गत घरकुल पात्र लाभार्थ्यांना शैक्षणिक कामांसाठी लागणाऱ्या कागदपत्रांचे वाटप करण्यात आले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कोतवाल गौतम भिलाव, ग्रामपंचायत कर्मचारी बबलू राजपूत, निलेश राजपूत, रवींद्र ठाकरे, सजीव भिलाव, उपसरपंच संतोष धोडरे आणि साजन भिलाव यांनी सहकार्य केले.

# ‘दिव्या’ विजेती



भारतात उदारीकरणाचे पर्व सुरू झाल्यानंतर सारे चित्र पालटले आणि महिलांची सर्वच क्षेत्रांत पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून भाग घेण्याची चढाओढ सुरू झाली. आता जागतिक बुद्धिबळ स्पर्धेतही भारतीय महिलांनी आपला झेंडा उंचच ठेवला आहे. जॉर्जियातील बाटुमी येथे सुरू असलेल्या विश्वचषक बुद्धिबळ स्पर्धेत दिव्या देशमुख आणि कोनेरू हम्पी यांच्यात पहिला डाव बरोबरीत सुटला; परंतु त्यानंतर टायब्रेकरमध्ये महाराष्ट्राच्या दिव्या देशमुखने कोनेरू हम्पीला नमवत विश्वचषकावर आपले नाव कोरले. भारतासाठी ही गौरवास्पद बाब आहे. अंतिम फेरीत भारताच्याच दोन्ही महिला एकमेकांसमोर होत्या. त्यामुळे कुणीही जिंकले असते तरी चषक भारताकडेच येणार होता. यावरून ही बाब स्पष्ट झाली की, भारतीय महिला क्रीडापटू आपला झेंडा उंचावण्यासाठी सदैव तत्पर असतात.हा सामना ऐतिहासिक होता याचे कारण असे की, दोन्ही भारतीय महिला सुवर्ण आणि रौप्य चषकासाठी लढत होत्या. ही स्पर्धा २०२६ च्या फिडे बुद्धिबळ स्पर्धेसाठी पात्रता फेरीची लढत समजली जाईल. भारतीय महिलांसाठी हा क्षण ऐतिहासिक आहे, कारण या पूर्वी कोणत्याही महिलांनी बुद्धिबळ स्पर्धेत असे यश मिळवले नव्हते. कोनेरू हम्पी ही आंध्र प्रदेशची तर दिव्या देशमुख ही नागपूरची. दोघींनीही आपल्या अगोदरच्या सामन्यात अभूतपूर्व कामगिरी केली आहे. भारतीय महिलांचे कौतुक करत असतानाच एक बाब मात्र स्पष्टपणे जाणवते की, आमच्या महिलांनी सर्व क्षेत्रात अभूतपूर्व कामगिरी केली आहे. पुरुषांइतक्याच स्त्रिया क्रीडा विश्वातही अढळ स्थान निर्माण करू शकतात हे या दोघींनी दाखवून दिले आहे.अर्थात महिला बुद्धिबळ विश्वात अजून खूप मागे आहेत. १९८० पासून त्या बुद्धिबळ क्रीडा विश्वात आहेत पण फार थोड्यांनी अव्वल बुद्धिबळ स्पर्धेतील विजेते म्हणून झेप घेतली आहे. भारतात महिलांप्रती असलेली एकप्रकारे तुच्छ भावना सर्व खेळांमध्ये आहे. त्यात क्रिकेटमध्ये तर जास्तच आहे. पण आता महिला क्रिकेट खूप लोकप्रिय झाले आहे. बुद्धिबळ स्पर्धा पाहण्यासाठी जॉर्जिया येथे काल भरपूर प्रेक्षक जमले होते आणि ते दिव्या आणि कोनेरू हम्पी यांना चिअरअप करत होते. हे खूप आश्वासक चित्र आहे. एक काळ असा होता की, महिला या बुद्धिबळ स्पर्धा खेळण्यास शारीरिकदृष्ट्या सक्षम नाहीत असे समजले जात होते. आज अशी परिस्थिती राहिली नाही आणि ऑलिम्पिक असो की बुद्धिबळ असो, सर्वच क्षेत्रातील पुरुषांची मक्तेदारी मोडून काढण्यात महिला यशस्वी झाल्या आहेत. या सामन्यात कोण जिंकले किंवा कोण हरले हे महत्त्वाचे नाही. महत्त्वाचे आहे की, महिलांनी जबरदस्त झेप घेतली आहे आणि तिचे ऐतिहासिक महत्त्व आहे. या स्पर्धेतून ५० हजार अमेरिकन डॉलर भारतात येणार आहेत. त्यामुळे मिळणारे मानधनही महिलांसाठी प्रेरणादायी ठरू शकते. काही भारतीयांचे मत असे आहे की, अशा स्पर्धा तरुण मुलींना नवनवीन क्षेत्रे पादाक्रांत करण्यासाठी प्रेरणा देतील. महिला गट आणि पुरुष गट स्पर्धेतील येणारा पैसा यात खूप फरक असतो. क्रिकेटमध्ये तर पुरुषांच्या स्पर्धांच्या तुलनेत महिलांना मिळणारे मानधन यातील तफावत पाहिली तर डोके चक्रावून जाते. पण बुद्धिबळ स्पर्धेत एवढी रक्कम येणार आहे हे पाहून अनेक महिला बुद्धिबळ खेळाकडे आकर्षित होतील. दिव्याच्या या अविस्मरणीय विजयामुळे भारतीय महिलांची बुद्धिबळासाठीची क्रेझ आणखी वाढेल यात शंका नाही.भारतात अजूनही ग्रँडमास्टर्स फार कमी आहेत. २०२३ च्या आकडेवारीनुसार फक्त २३ महिला ग्रँडमास्टर्स होत्या. अनेक सनातनी आई-वडील आपल्या मुलींना बुद्धिबळाकडे वळू देण्यास नाखूश असतात. ही एक अडचण आहे. तरीही या सर्व परिस्थितीवर मात करून फिडे आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ स्पर्धेतील विजेतेपद भारतातील महिलांचे सहभागाचे चित्र बदलेल अशी आशा वाटते. पाच वेळा विश्वविजेता झालेला विश्वनाथन आनंद म्हणाला की, दिव्या देशमुख हिने फार मोठी प्रगतीची झेप घेतली आहे. ग्रँडमास्टर अभिजीत कुंटे यांच्या मतानुसार, दिव्या कधीही नवीन प्रयोग करण्यास घाबरली नाही. दिव्यासाठी ही एक जबरदस्त मोहीम होती, कारण महिला विश्वचषकाच्या अंतिम फेरीत प्रवेश करणारी ती पहिली होती. ३८ वर्षीय कोनेरू ह्म्पीच्या निम्म्या वयाच्या दिव्याने घेतलेली झेप अनेकांना प्रेरणादायक आहे. दिव्या आणि हम्पी यांच्यातील हा सामना असंख्य किशोरवयीन तरुणींसाठी प्रेरणादायक ठरेल आणि दिव्याच्या म्हणण्यानुसार सोप्या पद्धतीने विजय मिळवण्यात काय अर्थ असतो, विजय मिळवला पाहिजे तो तगड्या प्रतिस्पर्ध्यावर विजय मिळवून. तिच्या या मानसिकतेमुळेच आज तिने चिवट लढतीनंतर विश्वचषकावर नाव कोरले आहे. ती अत्यंत सकारात्मक पद्धतीने खेळते आणि बुद्धिबळाकडे पाहण्याचा हाच दृष्टिकोन महत्त्वाचा असतो आणि तो दिव्याला इतर खेळाडूंपेक्षा वेगळा करतो. दिव्या आधीच ‘कँडिडेट्स टूर्नामेंटसाठी पात्र ठरली आहे, जे बुद्धिबळ विश्वविजेतेपदाच्या वाटचालीतलं एक महत्त्वाचं पाऊल आहे. दिव्या देशमुख आता केवळ वर्ल्डकप विजेतीच नाही, तर तिने या ऐतिहासिक विजयासोबत ग्रँडमास्टरचा मानही मिळवला आहे. दिव्याने अनुभवी आणि उच्च मानांकन असलेल्या कोनेरू हम्पीचा पराभव करत हे प्रतिष्ठेचे विजेतेपद आपल्या नावे केले. असे विजेतेपद पटकवणारी ती पहिलीच भारतीय महिला ठरली आहे.

# व्हिज्युअल डबिंगमध्ये एआयची चमक



ऑटोमेशन’ आणि ‘कृत्रिम बुद्धिमत्ता’ ही आज सगळ्यात वेगाने वाढणारी क्षेत्रे बनत चालली आहेत. कृत्रिम बुद्धिमत्ता, मशीन लर्निंग, बिग डेटा ॲनालिसिस, रोबोटिक्स या आणि यासारख्या घटकांमुळे संबंधित संगणकीय प्रणाली आणि यंत्रणा अधिकाधिक ऑटोनॉमस म्हणजे स्वतंत्रपणे निर्णय घेणाऱ्या आणि स्वयंभू बनत आहेत यात शंका नाही. इंडस्ट्री ४.०, कृत्रिम बुद्धिमत्ता, ऑटोमेशन, रोबोटिक्स आणि डेटा अनॅलिटीक्स हे उद्याच्या तंत्रजीवन पद्धतीचे अविभाज्य घटक असतील. व्यक्तिगत तर सोडाच; परंतु औद्योगिक, सामाजिक आणि सार्वजनिक पातळीवर संगणकाच्या या विविध अवतारांचे अत्यंत क्रांतिकारी आणि दूरगामी परिणाम होतील. अनेक पारंपरिक संकल्पना मोडीत निघून नव्या पद्धती चटकन रुळतील. आज संगणकीय सूक्ष्म तंत्राचा प्रवेश प्रत्येक पैलूमध्ये झालेला आढळेल, किंबहुना तो तसा असणे हेच आपण गृहीत धरू इतक्या सहज हा बदल होणार आहे. याला ‘इंटेलिजंट कॉम्प्युटिंग’असे म्हटले जाते. या क्षेत्रातील सतत बदलणारे तंत्रज्ञान पाहून आपल्या जगण्याची कल्पनाच बदलते. बदलांचा हा वेग येत्या पाच-दहा वर्षांमध्ये अधिक वाढणार आहे. तो अधिक सर्वव्यापी होईलच, पण ज्या पैलूंमध्ये बदल दिसण्याची आपण कल्पनाही केली नव्हती अशा ठिकाणी तो आढळेल

आगीचा वापर किंवा चाकाच्या शोधापेक्षा कृत्रिम बुद्धिमत्ता हा एक महत्त्वाचा शोध टप्पा ठरू शकतो. हे जगात आतापर्यंतचे सर्वात वेगाने विकसित होणारे तंत्रज्ञान आहे. यामध्ये भाषा मॉडेल्स आणि सॉफ्टवेअर एजंट्सद्वारे अनेक व्हाईट-कॉलर नोकऱ्या पूर्णपणे संपवण्याची क्षमता आहे. तसेच बुद्धिमान ह्युमनॉइड रोबोट्सच्या वाढत्या पिढीद्वारे अनेक ब्ल्यू-कॉलर नोकऱ्याही संपू शकतात. हा असा पहिला शोध आहे, जो जवळजवळ प्रत्येक प्रकारे मानवापेक्षा श्रेष्ठ असण्याची धमकी देतो. कदाचित आपण विचार केला त्यापेक्षा लवकर. स्टिफन हॉकिंग्ज यांनी हा इशारा अनेक वर्षांपूर्वी दिला होता. आतापर्यंत शास्त्रीय आणि तांत्रिक बाबींमध्ये या तंत्राचा वापर झाला होता. मात्र कलाक्षेत्र यापासून दूर कसे राहील? चित्रपट एका भाषेत बनवला जातो. तो जगभरातील वेगवेगळ्या भाषा बोलणाऱ्या प्रेक्षकांपर्यंत पोहोचवायचा असतो, तेव्हा डबिंगचा उपयोग केला जातो. यामुळे प्रेक्षकांना चित्रपट त्यांच्या स्वतःच्या भाषेत समजण्यास मदत होते आणि ते कथेला अधिक चांगल्या प्रकारे जोडले जातात. डबिंगमुळे चित्रपटाचा प्रेक्षकवर्ग अनेक पटींनी वाढतो. प्रेक्षकांना उपशीर्षके (सबटायटलस) वाचण्याऐवजी डब केलेला चित्रपट पाहणे अधिक सोयीचे आणि आरामदायक वाटते. विशेषत:, लहान मुले किंवा वाचायला त्रास होणाऱ्यांसाठी डबिंग अधिक उपयुक्त ठरते. एकाच चित्रपटाच्या आवृत्त्या वेगवेगळ्या भाषांमध्ये तयार केल्याने तो प्रादेशिक बाजारपेठेत यशस्वी होऊ शकतो. वेगवेगळ्या भाषांमध्ये चित्रपट पुन्हा शूट करण्यापेक्षा डबिंग करणे अधिक सोपे आणि कमी खर्चाचे ठरते. यामुळे निर्मात्यांना कमी गुंतवणुकीत जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचता येते. आपण हे दाक्षिणात्य चित्रपटांबद्दल पाहिले आहे. आता अनेक चित्रपट एकाच दिवशी अनेक भाषेत प्रदर्शित केले जातात.

आज डबिंगमध्ये एआयचा वापर मोठ्या प्रमाणात वाढत आहे आणि या प्रक्रियेत अनेक महत्त्वपूर्ण बदल घडवत आहे. एआय-आधारित सॉफ्टवेअर मूळ संवादांचे जलद आणि अचूक भाषांतर करू शकते. एआय आता मानवासारखे नैसर्गिक आवाज तयार करू शकते. हे आवाज मूळ कलाकारांच्या आवाजाच्या टोन, लय आणि भावनांशी जुळवण्याचा प्रयत्न करतात. ‘टेक्स्ट-टू-स्पीच’ तंत्रज्ञानाचा वापर करून भाषांतरित मजकूर स्वयंचलितपणे आवाजात रूपांतरित केला जातो. एआय अल्गोरिदम व्हिडीओतील पात्रांच्या ओठांच्या हालचालींचे विश्लेषण करून तयार केलेला आवाज त्यांच्याशी जुळवण्याचा प्रयत्न करतात. एआय तंत्रज्ञान मूळ कलाकाराच्या आवाजाची नक्कल करू शकते. यामुळे डब केलेल्या संवादातही मूळ कलाकाराचाच आवाज असल्याचा अनुभव येतो. मूळ कलाकार डबिंगसाठी उपलब्ध नसतात किंवा त्यांचे निधन झालेले असते, अशा वेळी हे तंत्रज्ञान उपयुक्त ठरते. काही प्रगत प्रणाली, तर व्हिज्युअल माहितीचा वापर करून अधिक नैसर्गिक लिप-सिंक तयार करू शकतात. यामुळे डब केलेला भाग मूळ भागासारखाच दिसतो. इथे एक उदाहरण देता येते. ‘वॉच द स्काय’ हा स्वीडिश चित्रपट व्हिज्युअल डबिंग नावाच्या तंत्राचा वापर करून कलाकारांच्या ओठांच्या हालचालींमध्ये बदल करत असून एकही दृश्य पुन्हा शूट न करता आंतरराष्ट्रीय प्रेक्षकांसाठी डब केलेल्या इंग्रजी संवादांनुसार मॅप करत आहे. लॉस एंजेलिस येथील ‘फ्लॉलेस’ ही चित्रपटनिर्माती एआय फर्म आणि त्यांच्या ट्रूसिंक तंत्रज्ञानामुळे हे शक्य झाले आहे. ते अभिनेत्याच्या संपूर्ण कामगिरीचे विश्लेषण करते, त्यांच्या चेहऱ्याचे व्हॉल्यूमेट्रिक ३ प्रतिनिधित्व तयार करण्यासाठी डीप लर्निंगचा वापर करते आणि नंतर पोस्ट-प्रॉडक्शनमध्ये फुटेजमध्ये त्यांच्या तोंडाच्या हालचाली अनुकूल करते. डबिंगच्या क्षेत्रात एआय एक शक्तिशाली साधन म्हणून उदयाला आले आहे.

यामुळे भाषांतर, आवाज संश्लेषण आणि लिप-सिंकसारख्या प्रक्रियांमध्ये सुधारणा झाली आहे. यामुळे चित्रपट निर्मात्यांना जागतिक स्तरावर मोठ्या प्रेक्षकांपर्यंत पोहोचणे अधिक सोपे आणि प्रभावी झाले आहे. तथापि, भावनात्मक बारकावे आणि सांस्कृतिक संवेदनशीलता यांसारख्या काही क्षेत्रांमध्ये अजूनही मानवी हस्तक्षेपाची गरज भासते. त्यामुळे भविष्यात एआय आणि मानवी सहकार्याने डबिंगची प्रक्रिया अधिक परिपूर्ण होईल यात शंका नाही. एआयमुळे व्हीएफएक्स आणि डबिंगमध्ये अनेक फायदे असले तरी काही आव्हानेदेखील आहेत. एआयमुळे काही कामे स्वयंचलित होत असल्याने कलाकारांच्या आणि डबिंग कलाकारांच्या नोकऱ्यांवर परिणाम होण्याची भीती आहे. तथापि, अनेक तज्ज्ञांचे मत आहे की एआय मानवी सर्जनशीलतेची जागा घेणार नाही, तर एक शक्तीशाली साधन म्हणून काम करेल. यामुळे कलाकार अधिक सर्जनशील कामांवर लक्ष केंद्रित करू शकतील. या पार्श्वभूमीवर डीपफेक तंत्रज्ञानाचा वापर, सिंथेटिक आवाजांची संमती आणि सांस्कृतिक गैरसमज यासारख्या नैतिक मुद्द्यांचा विचार करणे महत्त्वाचे आहे. पूर्णपणे एआय-आधारित डबिंगमध्ये भाषिक आणि सांस्कृतिक बारकावे गमावले जाण्याची शक्यता असते. त्यामुळे या कामी मानवी देखरेख आवश्यक आहे. एकंदरीत, डबिंग उद्योगासाठी एआय गेम-चेंजर ठरले आहे. यामुळे निर्मिती प्रक्रिया अधिक कार्यक्षम, जलद आणि परवडणारी होत आहे. यामुळे मनोरंजन उद्योगात नवनवीन शक्यता निर्माण होत आहेत. भविष्यात, मानवी सर्जनशीलता आणि एआय तंत्रज्ञानाचे सहकार्य या क्षेत्रांना अधिक उंचीवर घेऊन जाईल.

प्रेक्षकांना उपशीर्षके वाचण्याऐवजी डब केलेला चित्रपट पाहणे अधिक सोयीचे वाटते. लहान मुले किंवा नीट वाचू न शकणाऱ्यांसाठी डबिंग जास्त उपयुक्त ठरते. एकाच चित्रपटाच्या आवृत्त्या वेगवेगळ्या भाषांमध्ये तयार केल्याने तो प्रादेशिक बाजारपेठेत यशस्वी होऊ शकतो. वेगवेगळ्या भाषांमध्ये चित्रपट पुन्हा शूट करण्यापेक्षा डबिंग करणे अधिक सोपे आणि कमी खर्चाचे ठरते. एआय तंत्रज्ञान या क्षेत्रात घडवत असलेल्या चमत्काराचा मागोवा.

# खड्ड्यांच्या शापातून रस्त्यांना मुक्ती कधी?

कोणत्याही कामाचे योग्य प्रकारे नियोजन केले तर त्याची दुरवस्था होत नाही. विशेषत: राज्यातील रस्त्यांच्या दुरवस्थेचा विचार करता, रस्त्यांचे बांधकाम व देखभाल अतिशय महत्त्वाचे असते. रस्त्यांचे बांधकाम व्यवस्थित केले असेल व त्याची चांगल्याप्रकारे देखभाल केली जात असेल तर रस्त्यांची दुरवस्था होणार नाही. मात्र सध्या काही ठिकाणी मुसळधार पावसामुळे रस्त्यांची फार दुरवस्था झालेली दिसून येते. याचा परिणाम वाहनचालकांना वाहन चालवताना जीव मुठीत धरून वाहन चालवावे लागते.



आपण जरी नैसर्गिक कारण पुढे केले किंवा वाहतूकदारांना जबाबदार धरले तरी सार्वजनिक बांधकाम विभागाचे नियंत्रण असणे गरजेचे आहे. कारण राज्यामधील रस्त्यांची देखभाल करण्याची जबाबदारी सार्वजनिक बांधकाम विभागाची असते. सध्या देशात रस्ते बांधणीला केंद्र सरकार अधिक पसंती देत आहे. मात्र रस्त्यांची दुरवस्था पाहून प्रवास कसा करावा असा प्रश्न सर्वसाधारण नागरिकांना पडला आहे. पावसामुळे सर्वत्र रस्त्यात खड्डे पडलेले दिसतात, तर काही ठिकाणी रस्ता एका बाजूने खचणे, दरड कोसळणे व रस्ता वाहून जाणे इत्यादी पाहायला मिळते. तरी सध्या खड्डे बुजविण्याचे काम ठिकठीकाणी सुरू असले तरी दुचाकी व चारचाकी वाहनचालकांना वाहन चालविताना तारेवरची कसरत करावी लागते. त्यात पादचाऱ्यांनाही या खड्ड्यांमधून चालताना त्रास सहन करावा लागतोय. ग्रामीण भागात तर रस्त्यांची दैनावस्था पाहायला मिळते. आजही खेड्यातील वाड्यांमध्ये रस्ते असले तरी त्यांची दुरवस्थाच आहे. त्यामुळे आजारी व्यक्तीला अगदी चादरीतून, पालखीतून उचलून घेऊन जावे लागते. असे चित्र आजही ग्रामीण भागात पाहायला मिळते. ही आपल्याकडे शोकांतिका आहे.१९ जुलै २०२३ रोजी रायगड जिल्ह्यातील खालापूर तालुक्यातील इर्शाळगडाच्या पायथ्याशी असलेल्या आदिवाशी पाड्यावर दरड कोसळली होती. तेव्हा तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना सुमारे दीड तास पायी चालत जावे लागले होते. मात्र आजही इथे ग्रामस्थांना पायी जाण्याजोगा रस्ता नसल्याने इथल्या ग्रामस्थांची अवस्था अशीच पाहायला मिळते. या नागरिकांचे इथे रोज काय होत असेल याचा विचार न केलेला बरा. तेव्हा शासकीय स्तरावर गाव तिथे रस्ता आणि तोही सुस्थितीत हवा. गावाला जोडणाऱ्या प्रत्येक वाडीमध्ये जायला कायमस्वरूपी रस्ता केला पाहिजे. तेव्हा अशा गावांची दखल घेऊन शासन पातळीवर आदर्श गाव घोषित करावे. आज आपल्याकडे शहरीभागात रस्ते खड्ड्यात आहेत. खेड्यात तर अनेक रस्त्यावरील पूलही मोडकळीस आले आहे. बऱ्याच ठिकाणी रस्त्याच्या बाजूला गटारं नाही, मग सांगा पाणी वाहून कसे जाणार..!

याचा परिणाम डांबरीकरण केलेला रस्ता पावसाळ्यात वाहून जातो. नंतर रस्ता पावसाच्या पाण्याने वाहून गेला अशा प्रकारची वृत्त ऐकायला मिळतात. मुंबई-गोवा या राष्ट्रीय महामार्गाचे चौपदरीकरण करण्याचा निर्णय २०१० साली घेण्यात आला. अजूनही या महामार्गाचे काम पूर्ण झाले नाही. ३१ मे २०२५ पर्यंत रस्त्याचे काम पूर्ण होईल असे केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी सांगितले होते. आता मार्च २०२६ पर्यंत काम पूर्ण करण्याचे आदेश केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री यांनी काम करणाऱ्या कंपन्यांना दिले. मुंबई-गोवा महामार्गाचे काम सुरू झाल्यापासून आतापर्यंत सुमारे २४४० नागरिकांना आपल्या जीवाला मुकावे लागले आहे. तेव्हा लवकरात लवकर या राष्ट्रीय महामार्गाचे काम पूर्ण होवो ही तमाम कोकणातील नागरिकांची मागणी आहे.बऱ्याचवेळा रस्त्यांची दुरवस्था झाली की पावसाचे कारण पुढे केले जाते. नंतर बातम्या प्रसिद्ध होतात. पावसामुळे रस्त्यांची दुरवस्था झाली असे असेल, तर मग सांगा यात कितपत सत्यता आहे असे वाटते. असे असेल तर देशातील सर्व रस्त्यांची दुरवस्था पाहायला मिळाली असती. यात जुने रस्ते सोडा नवीनही रस्त्यांची दुरवस्थाच असती. सध्या अनेक ठिकाणी रस्त्यावर मोठे खड्डे पडले असून त्यात पाणी साचल्याने वाहनचालक, पादचारी व रस्त्याला लागून असलेली दुकाने यांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. यात काहींचा अपघात होऊन जीव गमवावा लागला आहे. यासाठी लवकर महामार्गाचे काम पूर्ण होणे गरजेचे आहे. म्हणजे चालक, पादचारी व रस्त्यालगतचे दुकानदार बिनधास्तपणे आपले काम करू शकतात. केवळ मुंबई-गोवा महामार्ग नव्हे तर देशात अलीकडच्या काळात अनेक ठिकाणी रस्त्यांच्या रुंदीकरणाचे काम सुरू आहे. त्यात काही ठिकाणी निधीअभावी अर्धवट कामे राहिली आहे. त्यामुळे याचा जास्त त्रास सर्वसाधारण नागरिकांना सहन करावा लागतो. तेव्हा राज्यातील महामार्गांचा विचार करता राष्ट्रीय महामार्गांची जबाबदारी ही राज्याची नसून केंद्र सरकारची असते. शहरातील रस्त्यांची जबाबदारी नगर पालिका, महानगर पालिका व स्थानिक स्वराज्य संस्थेची असते. ग्रामीण भागातील रस्त्यांची देखभाल राज्य सरकार त्याचप्रमाणे त्या जिल्ह्यातील जिल्हा परिषदेची असते. असे असले तरी यामध्ये सुजाण नागरिकांची भूमिका अतिशय महत्त्वाची असते.नागरिकांनी वाहतूक नियमांचे पालन करून आपल्या विभागात रस्त्यांची दुरवस्था झाली असल्यास लागलीच संबंधित विभागाला तक्रार करून रस्त्याच्या दुरुस्तीविषयी तत्काळ आवाज उठविणे आवश्यक आहे. तेव्हा आपल्या महाराष्ट्र राज्यातील रस्त्यांची दुरवस्था झाल्यामुळे त्याची कारणे शोधून उपायांची नि:पक्षपातीपणे अंमलबजावणी होणे गरजेचे आहे. म्हणजे राज्यातील रस्त्यांची समृद्धी होण्याला वेळ लागणार नाही. शेवटी रस्त्यांच्या दुरवस्थेला जबाबदार कोण? असे जरी आपण म्हणत असलो तरी त्याला आपणच सर्वजण जबाबदार आहोत, हे मात्र निश्चित.दर्जेदार रस्ते होण्यासाठी साहित्यही दर्जेदार वापरायला हवे. चांगल्या दर्जाचे साहित्य वापरले गेले तर रस्त्यांची आज ही स्थिती होणे शक्य नव्हते. कंत्राट देण्यापासून सुरू होणारी ’पर्सेंटेज’ बंद व्हायला हवी. लोकांना चांगल्या सुविधा देण्यासाठी कंत्राटदाराला त्यांच्या कामाचा चांगला मोबादला मिळत नसेल, तर चांगले रस्ते कसे तयार होतील हा प्रश्नही येतोच. लोकांना चांगले रस्ते, चांगले पूल मिळायला हवेत पण त्यासाठी सर्वात आधी सार्वजनिक बांधकाम खात्यातील भ्रष्टाचार थांबवण्याचे शिवधनुष्य पेलण्याचे आव्हान आहे. भ्रष्टाचाराचा पडलेला खड्डा बुजवून सरकारने हे शिवधनुष्य पेलण्याचे धाडस दाखवले, तर राज्यातील रस्ते दर्जेदार होऊ शकतात आणि रस्तेही खड्डेमुक्त होतील.

# प्रा.के.हरिबाबू सरांनी आपलं आयुष्य महाविद्यालयाच्या उन्नतीसाठी व विद्यार्थ्यांना घडविण्यासाठी दिलं-खासदार.रविंद्र पाटील चव्हाण

**नायगाव । हनुमंत चंदनकर**

नायगांव येथील शरदचंद्र महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. के. हरिबाबू यांच्या सेवानिवृत्त सोहळ्याचे आयोजन शहरातील अंबिका मंगल कार्यालय येथे करण्यात आले होते या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नांदेड जिल्ह्याचे खासदार प्रा. रविंद्र चव्हाण हे होते तर व्यासपिठावर नायगाव नगरपंचायतयचे उपनगराध्यक्ष विजय पाटील चव्हाण. शिवराज पाटील होटाळकर जिल्हाध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी.सय्यद रहीम सेठ माजी सभापती प.स.नायगाव. बालाजी बच्चेवार माजी जिल्हा परिषद सदस्य. ब्लू बेल्स शाळेच्या मुख्याध्यापिका सितामहालक्ष्मी कोपेलू, संजय बेळगे माजी सभापती जि प. संजय पाटील शेळगावकर,



देविदास पाटील बोमनाळे, प्रकाश पाटील भिलवंडे, माणिक लोहगावे माजी जि प सदस्य. गोविंद पवार. नारायण पाटील जाधव. माधव पाटील
कल्याण, शिवाजी पाटील कल्याण संजय पाटील चव्हाण. माणिक पा. चव्हाण पांडु पा.चव्हाण. विठ्ठल बेळगे. साईनाथ चन्नावार. जेष्ठ पत्रकार वहाबोदीन शेख.जेष्ठ पत्रकार सुर्यकांत सोनखेकर. मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष लक्ष्मण बरगे. प्रकाश हणमंते. माधव चव्हाण.रामप्रसाद चन्नावार .पंडित वाघमारे. शेख आरीफ. माधव बैलकवाड. हाणमंत चंदनकर. तानाजी शेळगावकर. यासह अनेकांची उपस्थिती होती यावेळी पुढे बोलताना खा. रविंद्र चव्हाण म्हणाले की, शरदचंद्र महाविद्यालय येथे प्राध्यापक म्हणून रूजू झाल्यानंतर आपले पुर्ण आयुष्य शिक्षणासाठी समर्पित केले असे म्हणून पुढील काळात सुध्दा शैक्षणिक मार्गदर्शन करत राहावे असे सांगत सेवानिवृत्तीच्या शुभेच्छा दिल्या यावेळी के.हरिबाबु सरांना चाहणारे मित्रमंडळ सगे सोयरे.पत्रकार. राजकीय क्षेत्रातील मान्यवर. इष्ट मित्र. नातेवाईक. मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सेवानिवृत्त प्राचार्य डॉ के हरिबाबू सरांनी आपले आयुष्य विद्यार्थ्यांना दिलं असे मत नांदेड जिल्ह्याचे लोकप्रिय खासदार प्रा. रवींद्र चव्हाण यांनी सेवापूर्ती सोहळ्यानिमित्त व्यासपीठावर व्यक्त केले....

**आज मी जे काही घडलो याचे संपूर्ण श्रेय चव्हाण परिवाराला जाते स्वर्गीय बळवंतरावजी पाटील चव्हाण स्वर्गीय वसंतराव पाटील चव्हाण यांचे उपकार मी कधीच विसरणार नाही यापुढेही मी विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन करणार असून नायगाव शहर मात्र मी कधीही सोडणार नाही मी सदैव चव्हाण परिवाराच्या ऋणात राहीण-सेवानिवृत्त प्राचार्य डॉ के हरिबाबू सर**

# भव्य विजय गौरव क्रीडा महोत्सवाचे आयोजन; सहभागी होण्याचे आवाहन

**नंदुरबार । दिपक गोसावी**

नंदुरबार जिल्ह्याचे नेते डॉ. विजयकुमार गावित यांच्या वाढदिवसानिमित्त १० ऑगस्ट २०२५ पासून चार दिवस विविध क्रीडा स्पर्धा आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे 'विजय गौरव क्रीडा महोत्सव समिती'तर्फे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवात व्हॉलीबॉल वगळता इतर सर्व स्पर्धा फक्त नंदुरबार जिल्ह्यातील खेळाडूंसाठी आहेत. विजेत्यांना मोठ्या प्रमाणात रोख बक्षिसे, ट्रॉफी आणि प्रमाणपत्रे दिली जाणार आहेत.

स्पर्धांचे तपशील आणि नोंदणीसाठी संपर्क क्रमांक:

* रोप स्किपिंग स्पर्धा (११ ऑगस्ट): १०,१४,१७ वर्षांखालील आणि खुल्या गटासाठी. नोंदणीची अंतिम तारीख ९ ऑगस्ट. संपर्क: धनराज अहिरे (८८८८४४०७२९).
* कॅरम स्पर्धा (११ ऑगस्ट): १८ वर्षांवरील खुल्या गटासाठी. नोंदणीची अंतिम तारीख ९ ऑगस्ट. संपर्क: जगदीश बच्छाव (९९२१२९०३१२).
* बुद्धिबळ स्पर्धा (१२ ऑगस्ट): १२,१४,१९ वर्षांखालील खेळाडू आणि १९ वर्षांवरील रेटेड खेळाडूंसाठी. नोंदणीची अंतिम तारीख १० ऑगस्ट. संपर्क: शोभराज खोंडे (८४८४८४०९७४).
* व्हॉलीबॉल स्पर्धा (१२-१३ ऑगस्ट): धुळे आणि नंदुरबार जिल्ह्यातील संघांसाठी. १७ वर्षांखालील मुलांसाठी पासिंग आणि १९ वर्षांवरील मुलांसाठी शूटिंग स्पर्धा. नोंदणीची अंतिम तारीख १० ऑगस्ट. संपर्क: योगेश निकुंभ (९७६४२२७११६).
* मॅरेथॉन स्पर्धा (१४ ऑगस्ट): १८ वर्षांवरील खुल्या गटासाठी. नोंदणीची अंतिम तारीख १२ ऑगस्ट. संपर्क: ईश्वर धामणे (९४२२२८५७०९).



या व्यतिरिक्त १३ ऑगस्ट रोजी शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. यात डॉ. विजयकुमार गावित यांच्या नेतृत्वाखालील जिल्हा विकासावर आधारित विषय आहेत. या महोत्सवात जास्तीत जास्त क्रीडाप्रेमींनी सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# नेप्तीत छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानास उत्स्फूर्त प्रतिसाद



**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

नगर तालुक्यातील नेप्ती येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान राबविण्यात आले. महसूल सप्ताह निमित्त घेण्यात आलेल्या या अभियानाला ग्रामस्थांसह शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

उपविभागीय अधिकारी सुधीर पाटील, तहसीलदार संजय शिंदे यांच्या मार्गदर्शनानुसार नेप्ती गावातील स्वस्तिक मंगल कार्यालयात सदर अभियान राबविण्यात आले. यावेळी मंडळ अधिकारी प्रताप कळसे व सामाजिक कार्यकर्ते रामदास फुले यांच्या हस्ते विविध दाखल्यांचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी माजी जिल्हा परिषद सदस्य अरुण होळकर, सरपंच संजय जपकर, मंडळ अधिकारी प्रताप कळसे, सामाजिक कार्यकर्ते रामदास फुले, शिवाजी होळकर, मनोहर काळे, अनिल पवार, मंडळातील ग्राम महसूल अधिकारी सुवर्णा रांधवन, रूपाली म्हस्के, दिपाली विधाते, दीपक झेंडे, विनायक दिक्षे, अमोल औटी, सुभाष नेमाने, भानुदास फुले, सुरज पवार, श्रीकृष्ण निमसे आदींसह परिसरातील शेतकरी, विद्यार्थी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानाच्या माध्यमातून ग्रामस्थ व विद्यार्थ्यांना आवश्यकतेनुसार जात प्रमाणपत्र, उत्पन्न दाखला, रहिवासी दाखला, नॉन क्रिमिलियर आदी दाखल्यांचे वाटप करण्यात आले. त्यामुळे अनेकांना शिक्षण, नोकरी व शासकीय योजनांचा लाभ घेण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. तसेच वृद्धांना संजय गांधी योजना, श्रावणबाळ योजना, जिवंत सातबारा-टप्पा एक व टप्पा दोन, ग्री स्टॅक या योजनेची माहिती देण्यात आली.एकाच छताखाली अनेक सेवा ही संकल्पना या शिबिराच्या माध्यमातून प्रत्यक्षात उतरवली गेली. नागरिकांना विविध खात्यांची कार्यालये न फिरता, एकाच ठिकाणी सेवा मिळाल्याने ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले.

# ठाणे आणि परिसरातील वाहतूक कोंडी तातडीने दूर करा-एकनाथ शिंदे

## खड्डे मुक्तीसाठी उपलब्ध असलेले उत्तम तंत्रज्ञान वापरावे



**ठाणे । प्रतिनिधी**

ठाणे आणि परिसरातील वाहतूक कोंडीमुळे नागरिक अतिशय त्रस्त झाले आहेत. सर्व यंत्रणांनी समन्वय साधून हा परिसर वाहतूक कोंडी मुक्त करावा. तसेच, रस्ते तातडीने दुरुस्त करून खड्डे मुक्तीसाठी उपलब्ध असलेले उत्तम तंत्रज्ञान वापरावे, असे निर्देश उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज दिले. सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत झालेल्या बैठकीत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी वाहतूक कोंडीची समस्या सोडवण्यात येत असलेल्या अपयशाबद्दल स्पष्ट शब्दात नाराजी व्यक्त केली. ठाण्यात कोपरी, माजिवडा यासोबत घोडबंदर रस्ता, गायमुख घाट ते फाउंटन हॉटेल, शिळफाटा परिसर येथे सकाळी आणि संध्याकाळी गर्दीच्या वेळी होत असलेल्या वाहतूक कोंडीमुळे नागरिक प्रचंड त्रस्त झाले आहेत. त्याबद्दलच्या तक्रारी वारंवार येत असून सर्व यंत्रणांनी समन्वय साधून हा पूर्ण परिसर वाहतूक कोंडी मुक्त करावा असे निर्देश उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी झालेल्या बैठकीत दिले. या बैठकीस ठाण्याचे जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्णनाथ पांचाळ, ठाणे महानगरपालिका आयुक्त सौरभ राव, पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे, वाहतूक पोलीस उपायुक्त पंकज शिरसाट आदी अधिकारी उपस्थित होते. सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता सिद्धार्थ तांबे यांना दुरध्वनीव्दारे सूचना दिल्या. गायमुख घाटातील रस्त्यामुळे वाहतूक कोंडी सातत्याने होत असून या समस्येवर अजूनही तोडगा काढण्यात यश आलेले नाही याबद्दल उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नाराजी व्यक्त केली. वाहतुकीचे व्यवस्थित नियोजन करून ठाणे, भिवंडी, शिळफाटा आणि कोपरी या चारही भागातील वाहतूक कोंडीवर मात करावी. रस्ते दुरुस्ती करताना त्या कामाचा दर्जा चांगला असावा. रस्त्यावर दुरुस्तीचे उंचवटे तयार होऊ नयेत. त्याने अपघात होतात, याकडे कटाक्षाने लक्ष द्यावे. खड्डे मुक्ती झाल्यास वाहतूक सुरळीत होण्यास मदत होईल. त्यामुळे उपलब्ध असलेले उत्तम तंत्रज्ञान वापरून खड्डे मुक्ती करावी, असेही उपमुख्यमंत्री शिंदे यांनी स्पष्ट केले.

# प्रत्येक मेट्रो स्थानकाखाली राखीव प्रवासी थांबा-परिवहन मंत्री प्रताप सरनाईक

**ठाणे । प्रतिनिधी**

कापुरबावडी ते घोडबंदर मार्गावरील ८ मेट्रो स्थानकाच्या खाली स्वतंत्र प्रवासी थांबे निर्माण करावेत. जेणेकरून प्रवाशांना मेट्रो मधून उतरल्यानंतर पूरक वाहतूक व्यवस्था निर्माण होईल अशा सूचना परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी संबंधित मेट्रोच्या अधिकाऱ्यांना केल्या. ते मेट्रो स्थानके व त्या अनुषंगिक विविध विकास कामांच्या पहाणी दौऱ्याच्या अनुषंगाने बोलत होते. यावेळी ठाणे महापालिका , मुंबई महानगर क्षेत्र विकास प्राधिकरण , वाहतूक विभागाचे संबंधित अधिकारी उपस्थित होते.



मंत्री सरनाईक म्हणाले की ५-६ वर्षापूर्वी ठाणे मेट्रो चे काम सुरू झाले तेव्हा सेवा मार्ग हा मुख्य रस्त्याच्या बाजूला होता. परंतु घोडबंदर मार्गावरील वाढती वाहतूक कोंडी लक्षात घेता, तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना विनंती केली की सध्याचा सेवा मार्ग हा मुख्य रस्त्यामध्ये विलीन करावा जेणेकरून घोडबंदर रस्त्यावरील वाहतूक कोंडीचा प्रश्न मिटू शकेल त्या अनुषंगाने ६०० कोटी रुपये अतिरिक्त निधी यासाठी उपलब्ध करून देण्यात आला. सदर काम पावसाळ्यानंतर सुरू करून या वर्षाअखेरीस पूर्ण करावे अशा देखील सूचना मंत्री सरनाईक यांनी या वेळ केल्या. तथापि सेवा मार्ग व मुख्य रस्ता याच्या मधोमध मेट्रोचे स्थानकाचे जिने उतरत असल्यामुळे ते भविष्यात प्रवाशांना धोकादायक ठरू शकतील अशा तक्रारी नागरिकांकडून येऊ लागल्या. या संदर्भात प्रत्यक्ष पाहणी करून तोडगा काढण्यासाठी या दौऱ्याचे नियोजन केले होते. सध्या सेवा मार्ग मुख्य रस्त्याशी जोडला जात असल्यामुळे रस्त्याची रुंदी वाढलेली आहे. परंतु जिथे मेट्रो स्थानक आहे, तेथे प्रवासी उतरण्या च्या जिन्यालगत प्रवाशांना पूरक वाहतूक व्यवस्था निर्माण करणे गरजेचे असल्यामुळे सदर सेवा मार्ग हा त्या प्रवाशांसाठी स्वतंत्र थांबा म्हणून विकसित करावा अशी मागणी पुढे आली. त्या अनुषंगाने संबंधित अधिकाऱ्यांना निर्देश दिले आहेत की त्यांनी प्रत्येक मेट्रो स्थानकाच्या खाली सेवा मार्ग आरक्षित करून तेथे प्रवाशांना पूरक वाहतूक व्यवस्था निर्माण करावी जेणेकरून एसटी बस, शहर बस आणि रिक्षा व टॅक्सी या वाहनाखेरीज इतर वाहने या मार्गावरून येऊ नयेत. अशा प्रकारचे सूचनाफलक मुख्य रस्त्याच्या बाजूला लावण्यात यावेत अशा देखील सुचना त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. उपरोक्त सूचनाचे अनुषंगाने केलेले बदल वाकथ्रू च्या माध्यमातून १५ ऑगस्ट पर्यंत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीमध्ये आपणास दाखवण्यात यावेत व त्यांच्या अनुमतीने पुढील काम सुरू करावे व संपूर्ण घोडबंदर रस्ता सिमेंट काँक्रीटीकरण करावा असे निर्देश मंत्री सरनाईक यांनी यावेळी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

# काही स्टेटमेंट महत्त्वाचे असतात काही चुकीचे असतात: संयम ठेवून बोलले पाहिजे

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा मेघना बोर्डीकरांसह शिरसाटांना सल्ला

**मुंबई (वृत्तसंस्था)**-राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंत्री संजय शिरसाट आणि मंत्री मेघना बोर्डीकर यांच्या वक्तव्यांबाबत विचारलेल्या प्रश्नावर प्रतिक्रिया देताना सांगितले की, मंत्री अनेकदा भाषणामध्ये गमतीनेही बोलतात आणि प्रत्येक गोष्टीचा बाऊ करणे योग्य नाही. काही वक्तव्ये महत्त्वाची असतात, तर काही चुकीचीही असू शकतात. त्यामुळे प्रत्येक विधान गांभीर्याने घेणे आवश्यक नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे.मंत्री संजय शिरसाट यांनी सभेत बोलताना वादग्रस्त विधान केले होते. निधी मागा, सरकारचा पैसा आहे, आपल्या बापाचे काय जाते, असे वादग्रस्त विधान केले होते. तसेच आमदार रोहित पवार यांनी मंत्री मेघना बोर्डीकरांचा देखील एक व्हिडिओ शेअर केला होता. यात मेघना बोर्डीकर ग्रामसेवकला इशारा दिल्याचे पाहायला मिळते. याद राख, मेघना बोर्डीकरचा शब्द आहे, कानाखाली घालील आता, आत्ताच्या आत्ता बडतर्फ करुन टाकेल,' असा इशारा त्या देताना दिसते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या वादग्रस्त विधान प्रकरणावर प्रतिक्रिया देताना म्हणाले, मंत्री आपल्या भाषणामध्ये कधीकधी गमतीने देखील बोलतात, प्रत्येक गोष्टीचा आपण बावू करू लागलो तर हे योग्य नाही. काही स्टेटमेंट महत्त्वाचे असतात काही चुकीचे असतात, मेघना बोर्डीकर यांच्यासोबत बोलणे झाले आहे, त्यांचे बोलणे माध्यमांवर अर्धवट दाखवण्यात येत आहे.

मंत्री संजय शिरसाट यांनी केलेल्या वादग्रस्त विधानावर बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, संजय शिरसाट जे बोलले त्यात चुकीचे वाटत नाही. मात्र, संयम ठेवून बोलले पाहिजे, असा सल्ला फडणवीस यांनी संजय शिरसाट यांना दिला आहे. संजय शिरसाट यांच्या व्यक्तव्याचा निषेध करत शिवसेना ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी त्यांच्या राजीनाम्याची देखील मागणी केली आहे. तसेच आदित्य ठाकरे यांनी देखील खोचक टोला लगावला आहे.



# अण्णाभाऊ साठे जयंती निमित्त देवगिरी प्रतिष्ठान संचलित तुलसी समूहाच्या वतीने राज्यस्तरीय शालेय स्पर्धा संपन्न

## सातारा येथील मिथुन माने प्रथम तर कोल्हापुरची ऋतूजा शिवदास मुंडे द्वितीय

**केज । प्रतिनिधी**

साहित्यरत्न डॉ. अण्णा भाऊ साठे यांच्या १०५ व्या जयंतीनिमित्त देवगिरी प्रतिष्ठान, बीड संचलित तुलसी समूह यांच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय शालेय व महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा बीड येथील तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालयात रविवारी (३ ऑगस्ट) रोजी उत्साहात पार पडली. स्पर्धेचे उद्घाटन छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेचे उपायुक्त रवींद्र जोगदंड यांच्या हस्ते करण्यात आले. उद्घाटनप्रसंगी त्यांनी डॉ. साठे यांच्या कार्याचा मागोवा घेत विद्यार्थ्यांना प्रेरणादायी संदेश दिला. स्पर्धा कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तुलसी समूहाचे सर्वेसर्वा प्रा. प्रदीप रोडे होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. मनोहर सिरसाट, मराठवाडा शिक्षक संघाचे राजकुमार कदम, उत्तम अंभोरे, रामकिशन जोगदंड, राम गायकवाड, अर्जुन राठोड, डॉ. सुनील जोंधळे आदी उपस्थित होते.

स्पर्धेत राज्यभरातून शालेय आणि महाविद्यालयीन गटांतील १५४ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. स्पर्धेचे परीक्षण प्रा. डॉ. पांडुरंग सुतार, डॉ. चंद्रकांत साळवे, शरद सदाफुले, डॉ. नामदेव शिनगारे आणि प्रा. महादेव जगताप यांनी केले. स्पर्धकाची भाषाशैली, सादरीकरण, विषय समज व समारोप या मूल्यांकनावर आधारित स्पर्धकाचे परीक्षण करण्यात आले. या उपक्रमाचे प्रास्ताविक. प्रा. डी. जी. निकाळजे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. अंकुश कोरडे व प्रा. किशोर वाघमारे, तर आभार प्रदर्शन डॉ. विकास वाघमारे यांनी केले. देवगिरी प्रतिष्ठान गेली १६ वर्षे सातत्याने ही स्पर्धा आयोजित करत असून, विद्यार्थ्यांमध्ये विचारप्रवृत्ती, सृजनशीलता आणि समाजप्रबोधनाची जाणीव निर्माण होणे, हाच या स्पर्धामागील उद्देश असल्याचे प्रा. प्रदीप रोडे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून सांगितले. स्पर्धकांसाठी अल्प- उपहार व भोजनाची विनामूल्य व्यवस्था करण्यात आली होती. कार्यक्रमास शिक्षक, विद्यार्थी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.प्रथम क्रमांकः मिथुन माने (सातारा) १०,०००/, द्वितीयः ऋतुजा शिवदास मुंडे ( डॉ. दीपक पाटील आयुर्वेदिक व मेडिकल कॉलेज,कोल्हापूर) ७,०००/, तृतीयः मोहिनी पायझम (माजलगाव) - ५,०००/, कनिष्ठ गटात, प्रथम क्रमांकः प्रणाली धस (बार्शी) ७,०००/, द्वितीयः आस्था सोहनी (बीड) ५,०००/, तृतीयः दिशा मुंगळे (लातूर) - ३,०००/-. दोन्ही गटांतील तीन-तीन स्पर्धकांना प्रत्येकी एक हजार चे उत्तेजनार्थ पारितोषिक देखील देण्यात आले.



# इनरव्हिल क्लब ऑफ अंबाजोगाई अध्यक्षा सुरेखा सिरसट 'बेस्ट मोटिव्हेट प्रेसिडेंट ॅवॉर्डने' सन्मानित

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

पुणे, खडकवासला येथे डिस्ट्रिक्ट असेम्ब्ली कौशिकामध्ये एका शानदार कार्यक्रमात इनरव्हिल क्लब ॅफ अंबाजोगाईला विविध पुरस्कारांनी सन्मानीत करण्यात आले.यावेळी प्रमुख पाहुण्या म्हणून डिस्ट्रिक्ट चेअरमन डॉ. शोभनाजी पालेकर, श्रीमती चारूलता चिंचणकर यांची प्रमुख उपस्थिती होती. या भव्य कार्यक्रमात अंबाजोगाई इनर व्हिल क्लबला विविध पुरस्कारांनी सन्मानीत करण्यात आले. पुणे येथे ४१ वी इनरव्हिल डिस्ट्रिक्ट असेम्ब्ली कौशिका दि.१९ व २० जुलै रोजी अत्यंत दिमाखात संपन्न झाली. डिस्ट्रिक्ट मधील प्रत्येक क्लबचा त्यांनी वर्षभरात केलेल्या सामाजिक कार्याचा गौरव करण्याचा हा सोहळा असतो. या वर्षी इनरव्हिल क्लब ॅफ अंबाजोगाईच्या कार्याचे कौतुक सोहळ्यात खूप कौतुक झाले. इनर



व्हिल क्लब अंबाजोगाईला यावर्षी तीन विविध पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. यामध्ये प्रेस्टिजिअस ॅवॉर्ड अंबाजोगाई अध्यक्षा सुरेखा सिरसट यांना 'बेस्ट मिस पॅसिनेट प्रेसिडेंट' ,एक्सलंट ॅवॉर्ड फॉर हॅपी व्हिलेज प्रोजेक्ट ट्रॉफी ,थर्ड रँक मॅक्झिमम अटेंडंस् इन डिस्ट्रिक्ट इव्हेंटस्, जॉइन द चाईल्ड ॅण्ड युथ डेव्हलपमेंट , वुमेन्स एम्पावरमेंटचे सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला. क्लबच्या सदस्यां करिता याप्रसंगी डिस्ट्रिक्ट स्पोर्ट्स मिट स्पर्धा येथे घेण्यात आल्या त्यामध्ये अंबाजोगाई क्लबला दोन सुवर्ण ,एक कास्य ,एक ब्राँझ असे चार मेडल्स मिळाले. यावेळी फॉरेजिन लँग्वेज ॅनलाइन एज्युकेशन प्रोजेक्ट कमिटीने सन्मानपत्र देऊन सन्मान केला . इनरव्हिल क्लब ॅफ अंबाजोगाईने केलेल्या सामाजिक कार्याची दखल घेतल्याने सर्वत्र त्यांच्या कामाचे कौतुक होत आहे. क्लब पदाधिकारी आणि क्लब मेंबर्सची साथ व विविध व्यक्तींनी या सामाजिक कार्यात मदतीचा हात दिल्याने हे यश मिळाले आहे असे इनरव्हिल क्लब ॅफ अंबाजोगाईच्या अध्यक्षा सुरेखा सिरसट यांनी विशेष नमूद करून त्यांना धन्यवाद दिले आहेत.


# अनुसूचीत जाती आयोग तक्रार प्रकरणी शेख मंजूर यांच्यावर गुन्हा दाखल करण्यासाठी आंदोलन



**बीड । प्रतिनिधी**

खोटे दस्तऐवज तयार करुन फसवणूक केल्याप्रकरणी अनुसूचित जाती आयोगाकडे तक्रार करण्यात आली होती. आयोगाने गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले तरी गुन्हा दाखल न केल्याने पोलीस अधीक्षक कार्यालय, बीड येथे आंदोलन करण्यात आले. माजलगाव येथील माजी नगराध्यक्ष शेख मंजुर यांनी खोटे दस्तऐवज तयार करुन फसवणूक केली. याप्रकरणी अनुसूचित जाती आयोगाकडे तक्रार करण्यात आली होती. या तक्रारीची दखल घेऊन आयोगाने चौकशी करुन ३० दिवसात ना गुन्हा दाखल करुन त्याचा अहवाल कर पाठविण्याचे आदेश दिले होते. पण स्थानिक पोलिसांनी आरोपीशी संगणमत करुन फौजदारी गुन्हा अद्याप दाखल केला नाही. याकडे लक्ष वेधून घेण्यासाठी काही नागरीकांनी आज आयोगाच्या आदेशानुसार गुन्हा दाखल करावा या मागणीसाठी बीड पोलीस अधीक्षक कार्यालया समोर आंदोलन करण्यात आले. यामुळे या आंदोलनाची दखल घेऊन पोलीस अधीक्षक संबंधितांना गुन्हा दाखल करण्याचे आदेश देणार का? याकडे लक्ष लागले आहे.

# जिव्हाळा केंद्रातील अनाथ बेघर यांचे शासकीय रुग्णालय बीडच्या टीम कडून समुपदेशन शिबिर संपन्न



**बीड । प्रतिनिधी**

आज जिव्हाळा बेघर निवारा केंद्र येथे वेगवेगळ्या पद्धतीने आरोग्य विषयक मार्गदर्शन करण्यासाठी शासकीय रुग्णालय बीड येथील हरणमारे संतोष सर, यांनी आहार व आरोग्य याविषयी निवारा केंद्रातील वयोवृद्ध आजी आजोबा, दिव्यांग, मनोरुग्ण या सर्वांना सोप्या भाषेत सखोल मार्गदर्शन केले. तसेच श्रीमती पाटील मॅडम यांनी स्वच्छता आरोग्य शिक्षण या विषयावर प्रत्येकाला त्यांच्या भाषेमध्ये वरील विषयाचे फायदे समजावून सांगितले . सौ रुपाली राऊत मॅडम यांनी जिव्हाळा केंद्रातील सर्व लाभार्थ्यांना आहार व आरोग्य तसेच रोज सकाळी योगा आणि व्यायाम कसा करावा तसेच टाळ्या वाजवण्याचे फायदे अशा अनेक विषयांवर सखोल मार्गदर्शन केले. सर्व लाभार्थ्यांनी आलेल्या पाहुण्यांना मनापासून प्रतिसाद दिला. या कार्यक्रमाला जिव्हाळा परिवाराचे अभिजीत वैद्य राजू वंजारे छाया सरोदे आणि मोठ्या प्रमाणात अनाथ, बेघर, दिव्यांग, मनोरुग्ण, ज्यांना कोणीही नाही असे बेगर लाभार्थी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# ऊसतोड मजुरांच्या सक्षमीकरणासाठी आज मिशन साथी'चा भव्य शुभारंभ

## ऊसतोड मजुरांनो मिशन साथीचा लाभ घ्या-राज्याध्यक्ष प्रदीप भांगे

**वडवणी । लोकपत्रकार भांगे**

बीड जिल्ह्यातील हजारो ऊसतोड मजुरांच्या आयुष्यात ठोस बदल घडवून आणण्यासाठी आजपासून मिशन साथी या उपक्रमाचा भव्य शुभारंभ करण्यात येत आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री व बीड जिल्ह्याचे पालकमंत्री मा. ना. अजितदादा पवार यांच्या हस्ते सकाळी ११ वाजता बीड येथे या महत्त्वाकांक्षी उपक्रमाचा आरंभ होणार आहे.

बीड जिल्ह्यात ऊसतोड मजुरांची संख्या राज्यात सर्वाधिक आहे. ऑक्टोबर ते एप्रिल या कालावधीत गाळप हंगामात हजारो कुटुंबं स्थलांतरित होतात. या स्थलांतरामुळे मजुरांच्या मुलांच्या शिक्षणात अडथळा निर्माण होतो. यावर उपाय म्हणून २०२४-२५ मध्ये १९६ हंगामी निवासी शाळांद्वारे २०,५९५ विद्यार्थ्यांना शिक्षणात ठेवण्यात यश आले.मिशन साथी अंतर्गत खालील उपक्रम राबवले जाणार आहेत:महिला **आरोग्यसाथींची निवड:**१००० महिलांना आरोग्यसाथी म्हणून प्रशिक्षित करून आरोग्य विभागाच्या मार्गदर्शनाखाली कामाला लावले जाणार आहे. त्यांना प्राथमिक उपचाराचे प्रशिक्षण, माहितीपुस्तिका व औषधपेट्या दिल्या जातील. गोपीनाथ मुंडे महामंडळाच्या योजना जनतेपर्यंत:महामंडळाच्या सर्व योजना एका माहिती पुस्तिकेद्वारे मजुरांपर्यंत पोहोचवल्या जाणार आहेत.टोल-फ्री क्रमांक सुरु:

स्थलांतरदरम्यान मजुरांना येणाऱ्या अडचणींसाठी नवीन टोल-फ्री हेल्पलाईन सुरु केली जाणार आहे.

**१००% ओळखपत्र वितरण:**बीड जिल्ह्यातील सर्व मजुरांची ग्रामपंचायत स्तरावर ओळखपत्रांसाठी नोंदणी करण्यात



येणार आहे, ज्यामुळे सरकारी योजनांचा लाभ मिळवणे सुलभ होणार आहे.संपूर्ण योजनांचा लाभ 'सॅच्युरेशन' पद्धतीने:आयुष्यमान भारत कार्ड, घरकुल योजना, रेशन कार्ड आदी महत्त्वाच्या योजनांचा लाभ प्रत्येक नोंदणीकृत मजुराला मिळणार आहे.Whatsapp ChatBot सेवा:घरकुल योजनेसंबंधित तक्रारी निवारणासाठी विशेष Whatsapp ChatBot सेवा सुरू केली जात असून त्याचा शुभारंभ पालकमंत्र्यांच्या हस्ते होणार आहे या कार्यक्रमात जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागामार्फत महिलांना औषधपेट्यांचे वाटप करण्यात येणार आहे. या ऐतिहासिक उपक्रमासाठी ऊसतोड कामगार, मुकादम, वाहतूकदार, स्वयंसेवी संस्था आणि पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाबाबत महाराष्ट्र राज्य ऊसतोड कामगार मुकादम वाहतूक संघटनेचे राज्याध्यक्ष मा. प्रदीप श्रीरंगराव भांगे यांनी सर्व संबंधितांनी उपस्थित राहून या उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले आहे.

# ज्येष्ठ पत्रकार धनंजय कुलकर्णी यांचा वाढदिवसानिमित्त सत्कार समारंभ संपन्न



**केज । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई शाखा केज च्यावतीने ज्येष्ठ पत्रकार तथा सकल ब्राह्मण समाज संघर्ष समितीचे राष्ट्रीय अध्यक्ष धनंजय कुलकर्णी यांचा दिनांक ०५ आगष्ट २०२५ वार मंगळवार रोजी वाढदिवसानिमित्त सत्कार समारंभाचा कार्यक्रम शासकीय विश्रामगृह केज येथे पार पडला.

धनंजय कुलकर्णी हे ज्येष्ठ पत्रकार व रॉयल इंग्लिश स्कूल चे संस्थापक अध्यक्ष तथा सकल ब्राह्मण समाज संघर्ष समितीचे राष्ट्रीय अध्यक्ष आहेत.ते समाजकार्यात सतत अग्रेसर व प्रसिद्ध व्यक्ती म्हणून कार्यरत आहेत.यावेळी सत्कार समारंभासाठी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ केज तालुकाध्यक्ष चंद्रकांत पाटील,उपाध्यक्ष प्रदीप गायकवाड,सचिव विजय बिक्कड, कार्याध्यक्ष नंदकुमार मिसाळ,पत्रकार विरोधी हल्ला समिती अध्यक्ष विश्वास राऊत,पत्रकार रोहन गलांडे,पत्रकार हिरामण काळे आदी पत्रकार उपस्थित होते.

# लोकजगत वृत्तपत्राचे केज तालुका प्रतिनिधी म्हणून हिरामण काळे यांची निवड

## महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई शाखा केजच्या वतीने केले स्वागत

**केज । प्रतिनिधी**

लोकजगत वृत्तपत्राच्या संपादिका शेख आयेशा यांच्या मार्गदर्शनाखाली ताज्या बातम्या,लेख, आणि विविध विषया वरील माहिती वाचका पर्यंत पोहोंचवणे,हि जनहिताची कामे करण्यासाठी केज तालुका प्रतिनिधी म्हणून हिरामण काळे यांची निवड करण्यात आली आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की,लोकजगत हे महाराष्ट्रातील बीड जिल्ह्यात प्रकाशित होणारे मराठी भाषेतील साप्ताहिक वृत्तपत्र आहे

साप्ताहिक वृत्तपत्र हे एक सामान्य-बातम्या किंवा चालू घडामोडींचे प्रकाशन आहे जे आठवड्यातून एकदा किंवा दोनदा विविध ब्रॉडशीट,मासिके आणि डिजिटल



स्वरूपात प्रकाशित केले जाते.

लोकजगत या वृत्तपत्राचे केज तालुका प्रतिनिधी म्हणून हिरामण काळे यांची निवड झाल्याबद्दल सर्व स्तरावरून स्वागत व शुभेच्छा दिल्या जात आहेत.महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई शाखा केज पदाधिकारी यांच्या वतीने त्यांचा सत्कार केला आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077